# छत्र्यांच्या कॅनव्हासवर कलाविष्कार

म. टा. प्रतिनिधी, पुणे

विश्वकर्मा युनिव्हर्सिटीच्या कला आणि रचनाशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी छत्र्यांनाच 'कॅनव्हास' मानून त्यावर चित्रकारी केली आणि अशा ४० छत्र्यांमधून संकल्पना साकारली गेली, ती 'भारतीयत्वा'ची! या विद्यार्थ्यांना शिक्षकांनी स्वातंत्र्यदिनानिमित्त हा आगळावेगळा गृहपाठ दिला होता.

'बीए'च्या पहिल्या आणि दुसऱ्या वर्षाच्या मिळून ४० विद्यार्थ्यांना 'भारतीयत्व' या संकल्पनेवर अॅक्रेलिक रंग वापरून चित्रे रेखाटण्यास सांगण्यात आले. ही चित्रे रूढ पद्धतीनुसार कॅनव्हासवर न रेखाटता छत्र्यांवर रेखाटावीत, अशी कल्पना प्राध्यापकांनी मांडली आणि विद्यार्थ्यांनीही त्याला होकार दिला. काहींनी ध्वजाची संकल्पना मांडली, काहींनी महात्मा गांधींच्या चित्रातून भारतीयत्वाची संकल्पना मांडायचा प्रयत्न केला, तर काहींनी एकता, समता, बंधुता असे विषय घेऊन वारली पेंटिंग, डूडलिंग अशा वेगवेगळ्या पद्धती वापरून




छत्र्यांतून साकारलेल्या कलाविष्कारासह विश्वकर्मा युनिव्हर्सिटीचे विद्यार्थी आणि प्राध्यापक.

आपल्या मनातील भारतीयत्वाची संकल्पना चित्रांतून उतरवली. छत्र्यांवर काढलेल्या या सर्व चित्रांचे एक सुंदर इन्स्टॉलेशनही तयार करण्यात आले.

'विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला चालना देण्यासाठी ही कल्पना आम्ही मांडली. अभ्यासक्रमातील विषय कृतिशील प्रयोगांतून शिकवावेत, हा यामागे एक उद्देश होता,' असे कला आणि रचनाशास्त्र विद्याशाखेचे प्राध्यापक विवेक निंबोळकर आणि प्रा. मंदार नाईक यांनी सांगितले. अधिष्ठाता प्रा. डॉ. अवधूत अत्रे यांनीही यासाठी प्रोत्साहन दिले. विश्वकर्मा युनिव्हर्सिटीचे कुलगुरू प्रा. डॉ. सिद्धार्थ जबडे यांनी 'विद्यार्थ्यांना मोकळीक दिली, की ते किती सुंदर आविष्कार घडवतात,' असे म्हणत या प्रयोगाचे कौतुक केले.